# भारताच्या युवा ब्रिगेडने जिंकला विश्वचषक

## वैभव सूर्यवंशीची ८० चेंडूत १७५ धावांची घणाघाती फलंदाजी १०० धावांनी जिंकला सामना

**हरारे** : अंडर १९ विश्वचषकाच्या फायनल सामन्याचा थरार झिम्बाब्वे येथे रंगला. भारत आणि इंग्लंड १९ वर्षाखालील संघात फायनल सामना रंगला. या फायनल सामन्याचे नाणेफेक भारताने जिंकले. कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून प्रथम बॅटिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करत भारताने ४११ धावा केल्या. लक्ष्यप्राप्ती करताना इंग्लंडला फक्त ३११ धावा करता आल्या. भारताने अंतिम सामना तब्बल १०० धावांनी जिंकत विश्वचषकावर नाव कोरले.

भारताने अंतिम सामन्यात इंग्लंडचा १०० धावांनी पराभव केला. भारताने १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकण्याची ही सहावी वेळ आहे. वैभव सूर्यवंशीच्या १७५ धावा आणि गोलंदाजांच्या दमदार कामगिरीमुळे भारताला ऐतिहासिक विजय मिळाला. इंग्लंडला २८ वर्षांचा जेतेपदाचा दुष्काळ संपवण्याची संधी होती, परंतु त्यांना भारतीय संघाचे आव्हान पार करण्यात अपयश आले. अंडर १९ विश्वचषकाच्या इतिहासात कोणत्याच संघाला ३५० पेक्षा जास्त धावा काढता आल्या नाही. भारत हा पहिला संघ बनला त्यामुळे फायनल सामन्यात भारताने ऐतिहासिक कामगिरी केली.

झिम्बाब्वेची राजधानी हरारे येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ४११ धावा केल्या. १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात कोणत्याही संघाने केलेली ही सर्वोच्च धावसंख्या होती. वैभव सूर्यवंशीने ८० चेंडूत १५ चौकार आणि १५ षटकार मारत १७५ धावा केल्या. भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने अर्धशतक ठोकले. त्याने ५१ चेंडूत ५३ धावा केल्या. भारताकडून सर्वाधिक विकेट या अंबरीश सुकुमारने काढल्या. त्याने तीन विकेट काढल्या. प्रत्युत्तरात इंग्लंडला फक्त ३११ धावा करता आल्या. इंग्लंडने १७७ धावांवर सात विकेट गमावल्या होत्या, परंतु सेलेब फॉकनरने एका लढाऊ शतकासह इंग्लंडला विजयाच्या जवळ आणण्यासाठी धाडसी प्रयत्न केले. त्याने ६७ चेंडूत ११५ धावांची शानदार खेळी केली, पण इंग्लंडचा जेतेपदाचा दुष्काळ संपवू शकला नाही. आठव्या गड्यासाठी ९२ धावांची भागिदारी करत सेलेब फॉकनर व जेम्स मिंटो यांनी पराभव लांबवला खरा पण ते इंग्लंड संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. जेम्स मिंटोने ४१ चेंडूत २८ धावा करत सेलेब फॉकनरला साथ दिली.




हरारे : विश्वचषक उंचावून विजयाचा जल्लोष करताना भारतीय युवा संघ.




धावा १७५
चेंडू ८०
चौकार १५
षटकार १५
स्ट्रा. रे. २१८.७५

हरारे : शतक केल्यानंतर आनंद व्यक्त करताना वैभव सूर्यवंशी.

### भारत सहाव्यांदा विजेता ठरला

भारतीय संघाने सर्वाधिक वेळा १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकण्याचा स्वतःचा विक्रम सुधारला आहे. भारत आता सहाव्यांदा विजेता बनला आहे, या यादीत ऑस्ट्रेलियानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने चार वेळा १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकला आहे.

### वैभव सूर्यवंशीची चमकदार कामगिरी

यूथ वनडेत षटकारांचे शतक केवळ षटकारच नव्हे, तर एकूण धावांच्या बाबतीतही वैभवने आपली चमक दाखवली आहे. १९ वर्षांखालील एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याच्या शर्यतीत त्याने पाकिस्तानच्या बाबर आझमला (१२७१ धावा) मागे टाकले आहे. तसेच, यूथ वनडे क्रिकेटच्या इतिहासात १०० षटकार मारणारा तो जगातील पहिला फलंदाज बनला आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या बांगलादेशच्या जवाद अबरारच्या नावावर ५५ षटकार आहेत. भारतासाठी सर्वात वेगवान शतक वैभवने या सामन्यात भारतासाठी १९ वर्षांखालील विश्वचषकातील सर्वात वेगवान शतक झळकावण्याचा मान मिळवला आहे. त्याने राज बावाचा (६९ चेंडू) विक्रम मोडीत काढला. जागतिक स्तरावर या स्पर्धेतील हे दुसरे सर्वात वेगवान शतक आहे. या यादीत न्युझीलंडचा विल मलाजुक (५१ चेंडू) पहिल्या क्रमांकावर आहे.

## संक्षिप्त वृत्त




### परंडा येथील शिबिरात ४२ दिव्यांग व्यक्तींची तपासणी

**परंडा** : दिव्यांग उद्योग समूहाचे राज्य अध्यक्ष तानाजी घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ६ फेब्रुवारी रोजी परंडा येथे दिव्यांग तपासणी शिबिर यशस्वीपणे पार पडले. या शिबिरामध्ये अस्थिव्यंग २८, मतिमंद ८ आणि अंध ६ अशा एकूण ४२ दिव्यांग व्यक्तींची तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी करण्यात आली. तालुक्यातील दिव्यांग बांधवांना दिव्यांग प्रमाणपत्र तपासणीची सोय स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावी, तसेच धाराशिव येथे वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, या उद्देशाने दिव्यांग उद्योग समूहाच्या वतीने परंडा येथे अनेक वर्षांपासून दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येते. या तपासणी शिबिरासाठी धाराशिव येथून अस्थिव्यंग तपासणीसाठी डॉ. कृष्णा स्वामी, मतिमंद तज्ज्ञ म्हणून डॉ. सुहास शिंदे, तर अंध विभागासाठी तज्ज्ञ डॉ. पवन महाजन यांनी आपले कामकाज पाहिले. हा तपासणी कॅम्प यशस्वी होण्यासाठी दिव्यांग उद्योग समूहाचे अध्यक्ष तानाजी घोडके, परंडा तालुका अध्यक्ष तानाजी सांगडे, दिव्यांग नागरिक, सरकारी दवाखान्यातील कर्मचारी, डॉक्टर तसेच कार्यालयीन मुख्य अबरार पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांचे सहकार्य लाभले.

### पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**सोलापूर** : इतर मागास विकास विभागांतर्गत कार्यरत इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत विविध पुरस्कारांसाठी पात्र व इच्छुक व्यक्ती तसेच समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रातील उत्थानासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार, क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारांसाठी प्रस्ताव सादर करता येणार आहेत. यासाठी अर्जदार व्यक्ती/संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक, समाजाच्या उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय कार्य केलेले असावे, अर्ज विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल, शिफारस, पत्रे व प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक असून अपूर्ण अथवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येणार आहे. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख २१ फेब्रुवारी २०२६ असून, अर्ज सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सात रस्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, चौथा मजला, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

## रोहिणी चौधरी यांना राज्यस्तरीय शिक्षण माझा वसा पुरस्कार

**सोलापूर/प्रतिनिधी**

नू.म.वि. मराठा शाळेतील शिक्षिका रोहिणी सचिन चौधरी यांना शिक्षण माझा वसा हा राज्यस्तरीय युवा शिक्षक पुरस्कार शिक्षण विवेकतर्फे पुष्कर लेले यांच्या हस्ते रविवार दि. १ फेब्रुवारी रोजी प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे उत्साहात पार पडला.

गणित विषयातील उपक्रमाची मजा अपार, गणितातील संबोध साकार या नवोपक्रमासाठी रोहिणी चौधरी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, रोख ५,००० रुपये तसेच पुस्तक पोटली असे होते.

या कार्यक्रमास मिलिंद कांबळे, राजीव तांबे, डॉ. अर्चना कुडतरकर, संजीवनी शिंत्रे तसेच ममता क्षेमकल्याणी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन तसेच मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी रोहिणी चौधरी यांचे अभिनंदन केले.




पुणे : रोहिणी चौधरी यांना पुरस्कार देऊन सन्मान करताना पुष्कर लेले. यावेळी मान्यवर.



सोलापूर : साने गुरुजी कथामालेतर्फे पुस्तक संच स्वीकारताना मुख्याध्यापिका पाटील. यावेळी अशोक खानापुरे, अशोक म्हमाणे आदी.

## साने गुरुजी कथामालेतर्फे महावीर हायस्कूलला पुस्तक संच

**सोलापूर/प्रतिनिधी**

होटगी रोड येथील महावीर हायस्कूलला साने गुरुजी कथामाला यांच्याकडून श्यामची आई या पुस्तकांचा संच भेट देण्यात आला.

शालेय ग्रंथालयासाठी प्रशालेच्या मुख्याध्यापिका पाटील यांनी संच स्विकारला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटील होत्या. कार्यक्रमास साने गुरुजी कथामालाचे अध्यक्ष अशोक खानापुरे, दसाडे, अशोक म्हमाणे यांची उपस्थिती होती.

साने गुरुजींचे विचार, संस्कार प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावेत हा उद्देश या कथामालेचा असल्याचे रंगसिद्ध दसाडे यांनी म्हटले. उपस्थितांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन बसवराज बिराजदार यांनी केले.

पान १ वरुन...

### ''आपला विनायक झाला शहराचा महापौर!''

काम करेल, गरिबांच्या पाठीशी उभा राहील, असे म्हणताना त्यांचा आवाज दाटून आला. साध्या चाळीतून शहराचा प्रथम नागरिक बनलेला हा प्रवास आज हजारो तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. संघर्ष, जिद्द आणि कष्टाच्या जोरावर स्वप्न पूर्ण करता येतात, याचे जिवंत उदाहरण म्हणजे विनायक कोंड्याल आहेत, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. त्यांच्या महापौरपदाची घोषणा होताच चाळीत जल्लोष आणि जणू दिवाळी साजरी करण्यात आली.

### जय श्रीराम... एकच वादा देवेंद्र आणि विनायक दादा!

एकच वादा देवेंद्र दादा, एकच वादा विनायक दादा अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

बिनविरोध निवड झाल्याची घोषणा महापालिका परिसरात होताच गुलालाची मुक्त उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरात भाजप कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष साजरा केला. पांढरे शुभ्र कपडे, भाजपचे शेले यामुळे वातावरण पूर्णतः उत्सवी झाले होते. समर्थकांच्या जल्लोषामुळे मनपा इमारत अक्षरशः दणाणून गेली.

दुपारी १.२५ वाजता कोंड्याल सभागृहातून बाहेर येताच जल्लोषाला उधाण आले. १.३० वाजता पालकमंत्री गोरे दाखल होताच पुन्हा एकदा फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. क्रेनच्या सहाय्याने आणलेले भलेमोठे हार पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे आणि नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या गळ्यात घालण्यात आले.

दुपारी २.१० वाजता विशेष सजविलेल्या डिजिटल जीपमधून महापौर कोंड्याल यांनी नागरिकांना अभिवादन केले. २.१८ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद, यशवंतराव चव्हाण आणि इंदिरा गांधी यांच्या पुतळ्यांनाही अभिवादन करून मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.

### नियमित पाणीपुरवठ्यासह विविध सुविधा देण्याचा अजेंडा

आमदार देवेंद्र कोठे, आमदार सुभाष देशमुख, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी विश्वास टाकून मोठी संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. वरिष्ठांनी दिलेल्या संधीचे निश्चितच सोने करणार आहे. सोलापूरकरांनी भाजपावर मोठा विश्वास टाकला. मोठा विजय मिळवून दिला. सोलापूर शहराचा सर्वांगीण विकास करतानाच शहरवासीयांना पाणी, रस्ते, स्वच्छता, ग्रीन झोन यासह इतर सुविधा देण्याचा प्रयत्न करणार आहे. सर्वांना सोबत घेऊन कामकाज करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### करिष्मा जादुई! 'विनायक' चतुर्थी

यादरम्यान निर्णायक आघाडीवर शिवसेना शिंदे गट आणि एमआयएम या दोन्ही पक्षाच्या उमेदवारांनी आपले नाम निर्देशन पत्र मागे घेतल्याने कोंड्याल आणि देवकर यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. या त्यांच्या निवडीनंतर महापालिका आवारासह मुराराजी पेठ, भैया चौक परिसर आदी ठिकाणी अभूतपूर्व असा प्रचंड जल्लोष करण्यात आला. सोलापूर महानगरपालिकेची पहिली विशेष सभा सकाळी ११ वाजता महापालिकेच्या कै. यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृहात (कौन्सिल हॉल) आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा सोलापूरचे अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी हे होते. महापालिकेतील ३८ वे महापौर व ३७ व्या उपमहापौरांची निवड करण्यात आली. सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी महापौर व उपमहापौर पदासाठी इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे नगरसचिव कार्यालयात महापालिका नगरसेवक प्रवीण दंतकाळे यांच्याकडे दाखल करण्यात आली होती. दरम्यान, शुक्रवारी सकाळी ११ वाजून ४ मिनिटांनी नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी त्यांच्याकडे महापौर व उपमहापौर पदासाठी इच्छुक उमेदवारांनी दाखल केलेले उमेदवारी अर्ज पिठासीन अधिकारी गणेश निर्हाळी यांच्याकडे सुपूर्द केले. महापौर पदासाठी भाजप तर्फे विनायक रामकृष्ण कोंड्याल, शिवसेना (शिंदे गट) तर्फे प्रियदर्शन बाळासाहेब साठे तर एमआयएमचे तौफिक बाबुमियाँ हत्तुरे यांचा अर्ज होता. उपमहापौर पदासाठी भाजपकडून ज्ञानेश्वरी महेश देवकर, शिवसेना (शिंदे गट) प्रियदर्शन बाळासाहेब साठे आणि एमआयएमकडून आसिफ अहमद पीर अहमद शेख यांचा अर्ज दाखल झाला होता.

निवडणूक निर्णयाधिकारी तथा पिठासीन अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी या दोन्ही पदासाठीची निवडणूक प्रक्रिया सभागृहाला सांगितली. त्यानंतर ११.०८ वाजता महापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू केली. केलेल्या छाननीत भाजपचे कोंड्याल यांचे दोन्ही अर्ज त्याचबरोबर शिंदे गट आणि एमआयएमच्या उमेदवारांचेही अर्ज वैध ठरले असल्याचे पिठासीन अधिकारी निऱ्हाळी यांनी स्पष्ट केले. त्यानंतर ठीक ११.०९ ते ११.२४ वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटाचा वेळ देण्यात आला. या १५ मिनिटांच्या कालावधीत शिंदे गट आणि एमआयएमच्या उमेदवारांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी भाजपचे सभागृह नेते नरेंद्र काळे, विनायक कोंड्याल, अनंत जाधव, किसन जाधव यांनी अमोल शिंदे चेतन नरोटे यांच्यासह एमआयएमचे तौफीक हत्तुरे यांच्याशी चर्चा केली.

या टप्प्यावर अखेर शेवटच्या क्षणी एमआयएम आणि शिंदे गटाच्या उमेदवारांनी आपापले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यानंतर पिठासन अधिकारी यांनी कोंड्याल आणि देवकर यांची बिनविरोध निवड जाहीर केली. दरम्यान, समान निधी देण्याच्या अटीवर ही उमेदवारी मागे घेतल्याचे शिवसेना आणि एमआयएमच्यातीने स्पष्ट करण्यात आले. यावेळी डायसवर आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांची उपस्थिती होती. निवडणूक निर्णयाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी शांततेचं सर्वांनी सहकार्य केले याबद्दल आभार मानले. त्याचबरोबर नूतन महापौर आणि उपमहापौरांचे अभिनंदन करत विशेष सभा संपल्याचे जाहीर केले.